# दि कोडोली अर्बन को-ऑप बँक लि., कोडोली

प्रधान कार्यालय- कोडोली, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर-४१६११४.

## ६३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

*(फक्त सभासदांकरिता)*

बँकेच्या सर्व सभासदांना कळविणेत येते की, महाराष्ट्र शासनाच्या दि. ३० जुलै २०२१ रोजीच्या आदेशामधील मार्गदर्शक सुचने प्रमाणे आणि बँकेच्या उपविधीमधील तरतुदीस अनुसरुन आपल्या बँकेची **६३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दि. २५-०९-२०२१ इ।। रोजी सकाळी ठिक १०.०० वा आभासी पध्दतीने (Online/ऑनलाईन) VC/OAVM द्वारे** खालील कामांचे विचारार्थ बोलविणेत आली आहे. तरी सर्व सभासद बंधू-भगिनींनी सभेत वेळेवर उपस्थित व्हावे, ही विनंती.

**⁕ सभेपुढील कामे ⁕**

१) मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे.

२) दि. ३१ मार्च २०२१ अखेर संपणाऱ्या वर्षाक अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रक यास मंजूरी देणे.

३) सन २०२१-२०२२ साठी उत्पन्न व खर्चाचे अंदाजपत्रकास मंजूरी देणे व सन २०२०-२०२१ मध्ये मंजूर अंदाजपत्रकापेक्षा जादा झाले खर्चास मंजूरी देणे.

४) मा. संचालक मंडळाने सुचविलेल्या नफा विभागणीस मंजूरी देणे.

५) मा. अंतर्गत लेखापरिक्षक यांचेकडून प्राप्त झालेल्या सन २०२०-२०२१ च्या लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेणे.

६) मा. सनदी लेखापरिक्षक यांचेकडून प्राप्त झालेल्या सन २०२०-२०२१ च्या लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेणे व त्यावर संचालक मंडळाकडून केलेले खुलासे स्विकारणे.

७) मा. संचालक मंडळ व त्यांचे नातेवाईकांना दिलेल्या कर्जाची नोंद घेणे.

८) सन २०२१-२२ सालासाठी वैद्यानिक लेखापरिक्षक नेमणुकीबाबत रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांच्या निर्देशानुसार केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे व त्यास अनुषंगिक पुढील पुर्तता करणे.

९) सदर सभेत आभासी पध्दतीने (Online/ऑनलाईन) द्वारे सहभागी होऊ न शकलेल्या सभासदांच्या अनुपस्थितीस मंजुरी देणे.

१०) मा. अध्यक्षसो यांचे परवानगीने आयत्यावेळी सभेपुढे येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.

येणेप्रमाणे असे.

कोडोली, दि. १५-०९-२०२१

मा. संचालक मंडळाच्या आदेशावरून

| | | |
|---|---|---|
| **श्री. संतोष बी. माने** | **मा. श्री. सचिन पां. जाधव** | **मा. श्री. राहुल प्रकाश पाटील** |
| मुख्य कार्यकारी अधिकारी | उपाध्यक्ष | अध्यक्ष |

**विशेष सुचना :** १) सदर सभा सभासदांच्या प्रत्यक्ष उपस्थिती शिवाय आभासी पध्दतीने (Online/ऑनलाईन) आयोजित करणेत आली असून काही अनपेक्षीत परिस्थितीमुळे उदा. तांत्रीक कारणामुळे / दोषामुळे सदर वा.सा. सभेचे कामकाज खंडीत झाल्यास तांत्रीक त्रुटीचे निवारन/ दोषांची दुरुस्ती झाल्यानंतरच सदर सभा त्याच आभासी माध्यमावर (Link) लगेच सदर सभेचे कामकाज पुढे सुरु केले जाईल २) बँकेच्या उपविधीप्रमाणे सभेसाठी आवश्यक असणाऱ्या गणसंखेची पुर्तता न झाल्यास आवश्यक असणाऱ्या गणपुर्तीच्या निश्चितीसाठी सभासदांची उपस्थिती हे बँकेने सभा नियोजनासाठी नियुक्त केलेल्या फर्मच्या ऑनलाईल रेकॉर्डवर उपस्थिती सभासदांचा आभासी माध्यमाद्वारे शनिवार दि. २५-९-२०२१ रोजी स. १0.00 संपर्क (Login) होताच त्या सभासदाची सदर सभेत उपस्थिती ग्राह्य धरली जाईल. आणि सभेची गणसंख्या पुर्ती झाल्याचे गृहीत धरुन सभा कामकाज सुरु केले जाईल. गणपुर्ती अभावी सभा अर्ध्या तासासाठी तहकुब केली जाईल अशी तहकुब सभा त्याच दिवशी, त्याच ठिकाणी, सकाळी ठिक १०.३० वा. सुरु होईल. या सभेस गणपुर्तीची आवश्यकता असणार नाही या सभेमध्ये सभेपुढील मुळ विषयावर विचार विनिमय होईल. ३) कोव्हीड १९ साथीच्या पार्श्वभुमीवर शासनाच्या आदेशानुसार आभासी पद्धतीने (Online/ऑनलाईन) VC/OAVM द्वारे सभा आयोजित केल्याने सभासदांनी सभेला प्रत्यक्ष उपस्थित राहणेचे नसुन VC/OAVM द्वारे झुम मिटींग या ॲप द्वारे सभेमध्ये सहभागी होणेचे आहे. ४) सभेची नोटीस, बँकेचे सन २०२०-२०२१ चे नफातोटा पत्रक, ताळेबंद पत्रक (परिशिष्टासह), अंदाजपत्रक, वार्षिक अहवाल इ. तदनुषंगिक पत्रके मुख्यालय व सर्व शाखा कार्यालयातील नोटीस बोर्डावर व बँकेची वेबसाईट www.kodolicoopbank.com वर सभासदांच्या माहिती करीता प्रसिध्द केलेली आहेत. ५) बँकेची आर्थिक पत्रके व अहवालासंबंधी सभासदांना काही शंका अगर त्याबाबत काही प्रश्न असल्यास वा कांही सुचना करावयाच्या असल्यास, त्या दि. २०-०९-२०२१ अखेर कार्यालयीन वेळेत बँकेच्या इ-मेल आयडी kodoliub@kodolicoopbank.com या बँकेच्या अधिकृत संकेत स्थळावर पाठविण्याचे आहे. ६) VC/OAVM सभेकरिता उपस्थित राहण्यासाठी सभासदांनी आपले नाव, पत्ता, सभासद क्रमांक व्हॉटसॲप मोबाईल क्रमांक, इ-मेल आयडी इत्यादी माहिती नजिकच्या शाखेत दि. २०-९-२०२१ अखेर द्यावेत जेणे करुन सभेत समाविष्ठ होणेसाठी आवश्यक लागणारी लिंक आपणास पाठविता येईल. दि. २०-९-२०२१ नंतर माहिती सादर केलेल्या सभासदास वा.सा.सभेत सहभागी होता येणार नाही याची सर्वांनी नोंद घेण्याची आहे. ७) बँकेच्या दर्शनी भागांची किंमत रु. १००/- इतकी झालेली आहे व क्रियाशिल सभासदांसाठी रु. १०००/- किमान शेअर्स धारण करणे आवश्यक असल्याने, ज्या सभासदांचे भाग अपुर्ण आहेत, त्यांनी उर्वरीत भाग रक्कमेची भरपाई लवकरांत लवकर करावी. ८) सभासदांनी/खातेदारांनी त्यांच्या बँकेकडील केवायसी (KYC) नॉर्मस्‌ची पुर्तता करणे वा ती अद्ययावत करणे आवश्यक आहे. सर्वांनी त्याची खात्री करुन, अपुर्ण/अद्ययावत केवायसी लवकरात लवकर पूर्ण करावी. ९) सभासदांनी आपले पत्ते बदललेले असल्यास ते बँकेस त्वरीत कळवावेत. १०) मयत सभासदांच्या वारसांनी बँकेकडे योग्य ते अर्ज करुन सभासदत्व रद्द/वर्ग करावे. ११) सभासद व ठेवीदारांना त्यांच्या वारसांची नेमणुक बँकेकडे करण्याची सोय उपलब्ध आहे.

## अध्यक्षांचे मनोगत ..............

**सन्माननीय सभासद बंधू भगिनींनो,**

दि कोडोली अर्बन को-ऑप बँक लि., कोडोली या बँकेच्या सन २०२०-२१ च्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या आरंभी, मी आपणां सर्वांचे मनःपुर्वक स्वागत करतो. बँकेचा दि. ३१.०३.२०२१ रोजी संपणाऱ्या वर्षाचा अहवाल, मा. सनदी लेखापरिक्षकांनी प्रमाणित केलेला ताळेबंद व नफा तोटा पत्रक, तसेच बँकेच्या आर्थिक उलाढालीची माहिती मा. संचालक मंडळाचे वतीने आपले समोर सादर करीत आहे.

बँकींग अधिनियम सुधारणा विधेयक २०२० दि. १६ सप्टेंबर २०२० रोजी लोकसभेत व त्यानंतर दि. २२ सप्टेंबर २०२० रोजी राज्यसभेत मंजुर करण्यात आले. बँकींग रेग्युलेशन ॲक्ट १९४९ मध्ये सुधारणा ही बँकींग क्षेत्रातील आजपर्यंतची अमुलाग्र बदल घडविणारी घटना आहे. अशी वर्णन केल्यास ते चुकीचे ठरणार नाही. एकमेव सहकारी बँकांमधील ठेवीदारांच्या ठेवींना संरक्षण देणे हे या विधेयकाचे मुख्य उद्दीष्ट होते. या विधेयकातील सर्व तरतुदी देशातील सर्व नागरी बँका व मध्यवर्ती तसेच राज्य सहकारी बँकाना लागु होतील. राज्याच्या सहकारी कायद्यात कांहीही तरतुदी असल्या तरी यापुढे बँकींग रेग्युलेशन ॲक्ट मधील तरतुदी लागु रहातील. थोडक्यात भविष्यात नागरी सहकारी बँकावर पुर्ण पणे रिझर्व्ह बँकेचे नियंत्रण राहील.

या विधेयकातील तरतुदीमुळे बँकेच्या संचालक मंडळाबाबतचे सर्वाधिकारी व अडचणीतील सहकारी बँकांच्या ठेवीदारांच्या ठेवी सुरक्षित ठेवुन अन्य बँकांमध्ये विलीनीकरन असे महत्वाचे अधिकार रिझर्व्ह बँकेस प्राप्त झालेले आहेत. भांडवली बाजारातुन सहकारी बँकांना भांडवल उभारणीसाठी प्रयत्न करावे लागतील, तर सभासदांच्या शेअर्सची रक्कम परत देण्यावर निर्बंध घातलेले आहेत. लेखापरिक्षकाच्या नेमणुकीसाठी रिझर्व्ह बँकेची पुर्व परवानगी घ्यावी लागेल.

पुर्वी नागरी सहकारी बँकांसाठी स्वतंत्र असलेले डिपार्टमेंट ऑफ को-ऑपरेटिव्ह बँक्स सुपरव्हीजन (DCBS) व डिपार्टमेंट ऑफ को ऑपरेटिव्ह बँक्स रेग्युलेशन (DCBR) हे दोन विभाग बंद करण्यात आलेले असुन ते भारतातील व्यापारी, खाजगी, बिगर बँकींग या सर्व बँकांवर नियंत्रण ठेवणाऱ्या डिपार्टमेंट ऑफ सुपरव्हीजन (DOS) व डिपार्टमेंट ऑफ रेग्युलेशन (D0R) या दोन विभागांचे यापुढे नागरी सहकारी बँकांवर नियंत्रण रहाणार आहे.

थोडक्यात, नागरी सहकारी बँका या लोकशाही व सहकारी तत्वावर स्थापन झालेल्या असताना त्याचा उद्देश साध्य होत नसल्याचे कारण पुढे केले जात, बँकींग क्षेत्रातील स्पर्धा, आधुनिकीकरण व सहकारी बँकांची व्यावसायिकाता याबाबत प्रश्न उभा केला जात, या विधेयकाची गरज भासल्याचे कारण देत ही दुरुस्ती केली गेली आहे.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया स्थापित मालेगाम समितीने नागरी सहकारी बँकांच्या कामकाजामध्ये व्यावसायिकता यावी व तिच्या ठेवीदारांच्या ठेवी सुरक्षित रहाव्यात म्हणुन लोकशाही पद्धतीने निवडुण आलेल्या संचालक मंडळास या व्यावसायिक कामकाजासाठी मार्गदर्शन वा सहकार्य करण्यासाठी स्वतंत्र व्यवस्थापक मंडळ स्थापन करावे असे सुचित केले होते. याबाबत बराच उहापोह झाल्यानंतर रु. १००.०० कोटी पेक्षा जास्त ठेवी असलेल्या नागरी सहकारी बँकांना असे व्यवस्थापन मंडळ स्थापन करणेबद्दल सक्ती करणेत आली. त्यासाठी पोट नियम दुरुस्ती व त्यांस रिझर्व्ह बँकेची मान्यता यानंतर असे व्यवस्थापन मंडळ स्थापन होईल.

आपल्या बँकेच्या ठेवी १०० कोटी पेक्षा कमी असल्याने व्यवस्थापन मंडळ स्थापंण्याची सक्ती आपल्यावर नाही.

सन १९९१ मध्ये भारताने मुक्त अर्थव्यवस्था स्विकारली, त्यातच नरसिंहम कमिटीच्या शिफारशी,

हिशोब मानके व बँकींग क्षेत्रात वाढलेली स्पर्धा यासारख्या विविध घटकांचा व घटनांचा बँकींग क्षेत्रावर विपरीत परिणाम झाला. त्यामुळे होवु घातलेले बदल स्विकारत बँका सुरळीत होतात न होतात तोपर्यंत कोरोना महामारीने लोकांच्या आरोग्यावर घाला घातला आणि पुन्हा एकदा बिघडलेल्या आर्थिक स्थितीमुळे बँकींग क्षेत्र पार कोलमोडुन गेले.

स्पर्धा हा नागरी बँकांसाठी महत्त्वाचा विषय बनलेला आहे. खाजगी व व्यापारी बँका त्यांच्या आधुनिकीकरणामुळे व व्यावसायिक नोकर वर्गामुळे विविध सेवा व सुविधा ग्राहकांना देवुन आपल्याकडे आकृष्ट करुन घेत आहेत, त्यामुळे आपल्या ग्राहकांच्याही आपल्याकडुन अपेक्षा वाढलेल्या आहेत, आपण त्या वेळेत देवु शकलो नाही तर सहाजिकच आपणांस आपल्या नियमित ग्राहकाला मुकणार आहोत. निश्चितच आपण आधुनिकीकरण व व्यावसायिक सेवक वर्ग कार्यरत करणे अत्यावशक बनलेले आहे.

आपणही एटीएम कार्ड, आरटीजीएस/एनईएफडी, फास्ट टॅग, सीटीएस क्लिअरींग इ. सारख्या सुविधा आपल्या ग्राहकांना देत आहोत. बँकेने सायबर सिक्युरीटीज बाबत रिझर्व्ह बँकेने ज्या महत्वाच्या सुचना केलेल्या आहेत त्याचे पालन केलेले आहे.

बँकींग क्षेत्रातील बदलते तंत्रज्ञान याचा विचार करता त्याची आवश्यकता ही काळाची गरज आहे हे ध्यानात घेवुन त्याचा नागरी सहकारी बँकांनी दर्जेदार सेवा देण्यासाठी स्विकार केला पाहिजे. आपण तो स्विकारला नाही तर आपण या मुख्य प्रवाहातुन बाहेर फेकले जावु हे विसरता कामा नये.

कोरोना या महामारीची पहिली लाट ओसरते न ओसरते तो दुसऱ्या लाटेने जनमानसांची आर्थिक मानसिक व वैचारीक घुसमट केली. या महामारीचा आपल्या बँकेवरही निश्चितच परिणाम झाला. नविन कर्जे मंजुर करणे व वाटपावर मर्यादा आल्या, कर्ज वसुलीसाठी संचालक मंडळ, कर्मचारी स्तरावर विशेष प्रयत्न करुन वाढलेला एनपीए कमी करण्यात आला. मात्र कर्ज वाटपात सातत्य न राहिल्याने नफा कमी झाला. नफा विभागणी करताना बँकेचे स्वनिधी जास्तीत जास्त कसे वाढतील याचा प्रयत्न केलेला आहे, त्याचे अवलोकन घ्यावे व त्यांस मंजुरी द्यावी.

आपणां सर्वांनी, आपले सर्व व्यवहार आपल्याच बँकेत करुन बँकेची आर्थिक उलाढाल वाढविण्याची, तर कर्जदार सभासदांनी त्यांच्या कर्जाची वेळेत भरपाई करुन सहकार्य करण्याची आवश्यकता आहे व तशी आम्हां सर्व संचालकांची आपणांकडुन अपेक्षा आहे शिवाय तशी आपणांस आमची विनंती राहील.

बँकेच्या सांपत्तीक स्थितीचा आढावा घेतला असता, बँकेचे स्वनिधी रु. २९.२१ लाखांनी वाढलेले असुन बँकेचे भांडवल पर्याप्तता प्रमाण १६.९७ टक्के इतके आहे. ते रिझर्व्ह बँकेने विहीत केलेल्या प्रमाणापेक्षा ७ टक्के जादा आहे. बँकेची नेटवर्थ रु. ४ कोटीपेक्षा अधिक आहे. सबब बँकेची आर्थिक स्थिती भक्कम आहे.

बँकेच्या ठेवीमध्ये रु. ३५६.३९ लाखांनी वाढ झालेली असुन त्या वाढीचे शे.प्र.६.०८ टक्के आहे. कर्जामध्ये गतवर्षापेक्षा रु. १३०.६७ लाखांनी वाढ झालेली आहे.

वसुलीत सातत्य ठेवल्याने व थकीत खात्यांचा वर्षभर सातत्याने पाठपुरावा केल्याने बँकेची थकबाकी ६.२७ टक्के आहे तर निव्वळ एनपीए २.५ टक्के आहे. गतवर्षीपेक्षा हे प्रमाण कमी झालेले आहे.

बँकेस सन २०२०-२१ अखेर रु. १९.४६ लाख इतका निव्वळ नफा झालेला आहे. या आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षण मे ए के उमराणी ॲन्ड कंपनी कोल्हापूर यांनी केलेले असून त्यांनी बँकेच्या प्रगतिदर्शक आंकडेवारीमुळे शासकिय लेखापरिक्षणामध्ये अ वर्ग दिलेला आहे.

बँकेची कोल्हापूर शाखा भाडेकरार संपल्याने शाहूपुरी पहिली गल्ली येथे नविन जागेत स्थलांतरीत केलेली आहे. शाखा स्थलांतरनाचा प्रस्ताव रिझर्व्ह बँकेच्या मंजुरीसाठी पाठविलेला आहे.

त्याचप्रमाणे शाखा केर्ली ही केर्ली ग्रामपंचायतीच्या इमारतीमध्ये असुन त्यांनी त्यांना जागेची आवश्यकता असल्याने शाखा स्थलांतर करणेबद्दल पत्र दिलेले आहे. सबब ती शाखा शेजारच्या देवस्थान समितीच्या जागेत स्थलांतरीत करणेचे संचालक मंडळाने निश्चित केलेले आहे. त्यासाठी नविन फर्निचर करावे लागेल चालु सालच्या अंदाजपत्रकांत त्याची मागणी केलेली आहे.

त्याचप्रमाणे आधुनिक बँकींग सेवा देण्यासाठी व रिझर्व्ह बँकेने विहीत केलेले सायबर सिक्युरिटीच्या मार्गदर्शक तत्वांचे पालन करणेसाठी सद्याच्या कोअर बँकींग प्रणालीमध्ये बदल करावा लागणार आहे. त्यासाठी होणाऱ्या खर्चासाठी अंदाजपत्रकात मागणी केली आहे त्याचे अवलोकन घेवुन त्यासं मंजुरी देणेत यावी.

आरटीजीएस, एनइएफटी, रुपे डेबिट कार्ड, सीटीएस क्लिअरींग इ. अशया विविध सुविधा ग्राहकांना आपण देत आहोत. बँकेने क्युआर कोड ही युपीआयची सेवा उपलब्ध केलेली आहे व फास्ट टॅग हि नविन सुविधा बँकेतर्फे दिली जात आहे.

आपली बँक नॅशनल पेमेंट कार्पोरेशन ऑफ इंडिया (NPCI) ची सभासद झालेली असुन फंड ट्रान्स्फर, सीटीएस क्लिअरींग इ. सेवा सभासद व ग्राहकांना देत आहे.

एसएमएस बँकींग कार्यरत झालेले आहे. रोकड विरहीत किंवा कॅशलेस व्यवहारासाठी डिजीटल बँकींग अवलंबणे अत्यावश्यक झालेले असुन, सभासद व ग्राहकांसाठी रुपे डेबिट कार्ड सुरु केलेले आहे, त्याचा सर्वांनी लाभ घ्यावा.

सेवक वर्गाने कोरोना सारख्या महासंकटामध्ये सभासद, ग्राहकांना त्यांच्या आर्थिक गरजा भागविण्यासाठी व बँकीग सेवा देण्यासाठी, बँकेच्या सर्व शाखांचे कामकाज कोणतीही पर्वा न करता चालु ठेवलेले होते. सर्वाजनिक वाहतुक व्यवस्था नसतानाही कर्मचारी कामावर वेळेवर उपस्थित रहात होते व सभासद ग्राहकांना सत्वर सेवा देत होते, त्यांच्या या सेवेबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे.

बँकेचे कुशल मार्गदर्शक मा. अमरसिंह पाटील (भाऊ), तसेच आपणां सर्वांच्या सहकार्याच्या पाठबळावर स्पर्धेच्या युगातही नवनविन आव्हानांना तोंड देत बँकेने प्रगती साधलेली आहे. तो विश्वास व सहकार्य यापुढे कायम राहो ही अपेक्षा. आपल्या या विश्वासार्ह सहकार्याबद्दल आपले आभार !

आपण सर्व सभासद बंधु भगिनींनी पुनःश्च एकदा हार्दिक स्वागत करतो. आपणांपुढे सादर केलेली बँकेची आर्थिक पत्रके, नफा विभागणी, वार्षीक अहवाल, व अंदाजपत्रक अवलोकनी घ्यावीत व त्यांस मंजुरी द्यावी, हि विनंती.

धन्यवाद !

दि. १५/९/२०२१

**श्री. राहुल प्रकाश पाटील**

अध्यक्ष

दि कोडोली अर्बन को-ऑप बँक लि., कोडोली

जय हिंदं ! जय महराष्ट्र !

## सन २०२०-२०२१ सालचा

# ६३ वा वार्षिक अहवाल

**सन्माननीय सभासद बंधू भगिनींनो,**

आपल्या बँकेच्या सन २०२०-२०२१ च्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या आरंभी, मी आपणा सर्वांचे मनःपूर्वक स्वागत करतो. बँकेचा दि. ३१-३-२०२१ रोजी संपणाऱ्या वर्षाचा अहवाल व मा. चार्टर्ड अकौटंट, कोल्हापुर यांनी प्रमाणित केलेला ताळेबंद व नफा तोटा पत्रक, तसेच बँकेच्या आर्थिक उलाढालीची माहीती मा. संचालक मंडळाचे वतीने आपले समोर सादर करीत आहे.

**बँकेचा प्रगती दर्शक तक्ता**

(आंकडे लाखांत)

| सन | २०१० | २०१५ | २०२० | २०२१ |
|---|---|---|---|---|
| वसुल भाग भांडवल व राखीव निधी | ३१३.३९ | ५२०.०५ | ८४६.७४ | ८८६.३८ |
| ठेवी | २१४९.१८ | ४१५५.८५ | ५८५४.४५ | ६२१०.८४ |
| कर्जे | १३३८.२३ | २६२३.२६ | ३६०८.१४ | ३७३८.८१ |
| सी डी रेशो | ४५.३८% | ६३.१२% | ६१.६३% | ६०.२०% |
| गुंतवणुक | १६६३.१४ | १७६५.७८ | १९५१.०३ | १९८५.८८ |
| ढोबळ एनपीए | ११४.६५ | ५५.५९ | ३६८.१७ | ३१९.९९ |
| ढोबळ एनपीएचे येणेकर्जाशी शे.प्र. | ८.५७% | २.१२% | १०.२०% | ८.५६% |
| निव्वळ एनपीए | ३९.७७ | -१००.६५ | १५२.८८ | ८७.८३ |
| निव्वळ एनपीए येणे कर्जाशी शे.प्र. | ३.१५% | ०.००% | ४.५१% | २.५०% |
| नफा / तोटा | +६.३२ | +२०.९३ | +४२.३९ | +१९.४६ |
| सीआरएआर | १४.३३% | १८.८४% | १८.९२% | १६.९७% |
| ऑडीट वर्ग | अ | अ | अ | अ |

**✻ सभासद व भाग भांडवल :**

दि. ३१-३-२०२० अखेर बँकेचे **'अ'** वर्ग सभासद ३३७७२ होते. अहवाल सालामध्ये ११२ नविन सभासद झाले असून, मयत व राजीनामा या कारणाने २७ सभासद कमी झाले व साल अखेर अ वर्ग सभासद संख्या ३३८५७ इतकी झालेली आहे.

ब वर्ग (नाममात्र सभासद) सभासद संख्या १४९ आहे. त्याचे अ वर्ग सभासदांशी शे.प्र.०.४४ टक्के इतके आहे.

बँकेची अधिकृत भाग भांडवल मर्यादा रु. ३००.०० लाख आहे. कर्जदार सभासदांच्या कर्जातुन व नविन सभासदांच्या मागणीतुन चालु आर्थिक वर्षामध्ये भाग भांडवलामध्ये रु. १०.४३ लाख इतकी वाढ झालेली असुन, माहे मार्च २०२१ अखेर बँकेचे वसूल भाग भांडवल रु. २४०.२४ लाख इतके झालेले आहे.

**⁕ राखीव व इतर निधी :**

बँकेचे स्व-निधी हे तिच्या आर्थिक मजबुतीकरणाचा पाया असुन, माहे मार्च २०२० अखेर बँकेचे एकुण निधी रु. ६१६.९३ लाख इतके होते. त्यामध्ये रु. २९.२१ लाख इतकी वाढ झाली असून, माहे मार्च २०२१ अखेर एकुण निधी रु. ६४६.१४ लाख इतके झालेले आहेत.

**⁕ ठेवी :**

माहे मार्च २०२० अखेर बँकेच्या ठेवी रु. ५८५४.४५ लाख इतक्या होत्या. त्यामध्ये अहवाल सालात रु. ३५६.३९ लाख इतकी वाढ झाली आहे. त्यामुळे वर्ष अखेरीस एकूण ठेवी रु. ६२१०.८४ लाख इतक्या झालेल्या आहेत. या वाढीते शे. प्र. ६.०९% इतके आहे.

**बँकेने डिपॉझीट इन्शुरन्स कार्पोरेशनकडे बँकेच्या ठेव विमा हप्त्याची रक्कम वेळेत अदा केलेली आहे.**

**बँकेकडील रु. ५.०० लाखापर्यंतच्या ठेवींना विमा संरक्षण आहे.**

| अर्धवर्ष | विमा हप्ता रक्कम | विमा महामंडळास विमा हप्ता अदा करावी अदा करायाची तारीख | विमा महामंडळास बँकेने विमा हप्ता अदा केलेली तारीख |
|---|---|---|---|
| पहिले अर्धवर्ष सप्टे.२० | रु. ४,४८,४४८-०० | ३०/११/२०२० | ०३/११/२०२० |
| दुसरे अर्धवर्ष मार्च २१ | रु. ४,६०,२७०-०० | ३१/०५/२०२१ | २७/०५/२०२१ |

**⁕ कर्ज व्यवहार :**

ठेवीदारांकडुन विविध ठेवींच्या माध्यमातुन रक्कमा स्विकारणे, व अशी स्विकारलेली रक्कम ठेवीदाराने मागणी केल्यानंतर वा त्या ठेवींची मुदत संपल्यानंतर परत करणे, त्यावर द्यावे लागणारे व्याज व त्या अनुषंगाने अन्य व्यवस्थापकीय खर्चासाठी उत्पन्न मिळविणेसाठी, ती जमा झालेली रक्कम आवश्यक दुरावा ठेवुन, योग्य व पात्र कर्जदारांमध्ये त्यांच्या आर्थिक गरजा भागविण्यासाठी वाटप करणे, हे व्यावसायिक बँकींग आहे.

त्याप्रमाणे अश्या योग्य व पात्र कर्जदारांना अदा केलेली कर्जे वेळेवर वसुल करणे व ठेवीदारांना त्यांच्याकडुन स्विकारलेल्या रक्कमा वेळेवर परत करणे व ठेवीदारांचा विश्वास प्राप्त करणे हे विश्वासार्ह बँकींग आहे.

बँकेचे संचालक मंडळ व्यावसायिक व विश्वासार्ह बँकींग करणयास कायम कटिबध्द आहे.

बँकेने दि. ३१-३-२०२१ अखेर रु. ३७३८.८१ लाख इतके एकुण कर्ज वाटप केलेले आहे. पैकी तारणी कर्जे रु. ३७१९.२९ लाख आहेत तर विनातारणी कर्जे रु. १९.५२ लाख इतकी आहेत. अनुक्रमे येणे कर्जाशी शे. प्र. ९९.४८% व ०.५२% इतके आहे.

बँकेने सन २०२०-२१ मध्ये केलेल्या एकुण कर्ज पुरवठ्यापैकी अग्रक्रम क्षेत्रास केलेल्या कर्ज पुरवठ्याचे प्रमाण ५९.२६% व आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकास केलेल्या कर्ज पुरवठ्याचे प्रमाण १६.०२% इतके आहे. याबाबतची रिझर्व्ह बँकेने जी मार्गदर्शक तत्वे निश्चित केलेली आहेत, त्याची उध्दीष्ट पुर्तता बँकेने केलेली आहे.

कर्ज मंजुरी व वाटप याबाबत संचालक मंडळाने काटेकोर धोरण स्विकारलेले असुन सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षात सरासरी सी डी रेशो ६१.२४% इतका राहीलेला आहे. दि. ३१-०३-२०२१ रोजी बँकेचा सी डी रेशो ६०.२०% इतका आहे.

## ❊ गुंतवणूक :

बँकेची माहे मार्च २०२१ अखेरची एकूण गुंतवणूक **रु. १९८५.८८** लाख इतकी आहे. गतवर्षीपेक्षा त्यामध्ये रु. **३४.८५** लाख इतकी वाढ झालेली आहे. बँकेकडील गुंतवणुक नियोजनबध्द केलेली आहे.

रिझर्व्ह बँकेच्या तरलतेच्या नियमानुसार सहकारी बँकांना माहे मार्च २०२१ अखेर तरलतेपोटी १८.०% इतकी गुंतवणुक सरकारी कर्जरोख्यांमध्ये करणे सक्तीचे होते. त्यानुसार सदर रक्कम रु. ११२१.९३ लाख इतकी होते. मात्र बँकेने दि. ३१-३-२०२१ अखेर सरकारी कर्जरोख्यांमध्ये रु. १४५९.६६ लाख इतकी गुंतवणुक केलेली आहे. या वाढीव गुंतवणुकीचे प्रमाण रिझर्व्ह बँकेने ठरवुन दिलेल्या प्रमाणापेक्षा (१८.०%) ५.४२% इतके (२३.४२%) अधिक आहे.

## ❊ थकबाकी :

बँकेची प्रगति व नांवलौकीक यांवर थकबाकीचा विपरीत परिणाम होतो. बँकेची प्रगति व रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्वांचा अम्मल करण्यासाठी कलम १०१/९१ अन्वये थकबाकीदारांवर दावे दाखल करावे लागलेले आहेत.

परंतु अद्यापही बरेच थकबाकीदार वारंवार तगादे व नोटीसा पाठवुनही थकबाकी भरपाई करीत नाहीत. अश्या थकबाकीदार कर्जदार व जामीनदार यांनी बँकेच्या प्रगतिमध्ये अडथळा आणणारा थकबाकीचा अडसर दूर करण्यास सहकार्य करावे.

बँकेकडील माहे मार्च २०२१ अखेरची एकुण थकबाकी रु. २३४.३९ लाख इतकी आहे. तिचे येणे कर्जाशी शे.प्र. ६.२७% इतके आहे. थकबाकी वसुलीसाठी अथक प्रयत्न केलेल्या सर्व संचालक, कर्मचारी यांचा मी मनःपुर्वक आभारी आहे.

## ❊ उत्पन्न संकल्पना, जिंदगीची वर्गवारी व तरतूद (N.P.A.) :

उत्पन्न संकल्पनेनुसार माहे मार्च २०२१ अखेरील एकुण एनपीए मुद्दल रु. ३१९.९९ लाख

इतके आहे. त्यामध्ये गतवर्षीपेक्षा रु. ४८.१८ लाखांनी घट झालेली आहे. अश्या एकुण थकीत मुद्दलाचे बँकेच्या एकुण कर्जाशी असलेले ढोबळ शे.प्र. ८.५६% इतके आहे. तर एकुण निव्वळ थकीत मुद्दलाचे बँकेच्या एकुण निव्वळ कर्जाशी असलेले शे.प्र. २.५% इतके आहे. गतवर्षीपेक्षा ढोबळ एन.पी.ए.चे शे.प्र. १.६४% इतके कमी झालेले आहे.

बँकेस या थकीत मुद्दलापोटी करावी लागणारी तरतुद रु. ११७.२९ लाख इतकी आहे. मात्र बँकेकडे बुडीत कर्जासाठीची केलेली तरतुद रु. २२४.९० लाख इतकी आहे. ती कराव्या लागणाऱ्या तरतुदीपेक्षा रु. १०७.६१ लाखांनी जादा आहे.

### ❊ भांडवल पर्याप्तता प्रमाण :

बँकींग हा एक प्रकारे व्यवसाय असुन, अन्य व्यवसायाप्रमाणे त्यामध्ये वेगवेगळ्या जोखिमा स्विकाराव्या लागतात. अश्या जोखिमांचे निराकरण करण्यासाठी बँकांकडे त्या प्रमाणात किमान किती स्वनिधी असावा, यातुन भांडवल पर्याप्तता प्रमाण (CRAR) ही संकल्पना अस्तित्वात आली.

रिझर्व्ह बँकेने सहकारी बँकांसाठी भांडवल पर्याप्तता प्रमाण किमान ९% इतके पुर्ण करणे आवश्यक केलेले आहे. दि. ३१-३-२०२१ अखेर बँकेचे भांडवल पर्याप्तता प्रमाण १६.९७% इतके आहे. रिझर्व्ह बँकेने विहीत केलेल्या प्रमाणापेक्षा ते ७.९७% इतके जादा आहे. यावरुन बँकेची आर्थिक स्थिती भक्कम असल्याचे स्पष्ट होते. रिझर्व्ह बँकेने सदर संकल्पना अंम्मलात आणले पासुन आपल्या बँकेने हे प्रमाण सातत्याने सहा टक्केपेक्षा जादा राखलेले आहे.

### ❊ संचालक व त्यांच्या नातेवाईकांची कर्जे :

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३(२) व बँकेचे पोटनियम क्र.३२ (१३) व रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्वानुसार दि. ३१-३-२०२१ अखेरची खालीलप्रमाणे संचालक व त्यांच्या नातेवाईकांच्या येणे कर्जाची माहिती दर्शविणारा तक्ता सादर केला आहे.

| अ.न. | तपशिल | वर्षाच्या सुरुवातीस येणे रक्कम | सहकार वर्षात मंजुर केलेली कर्जे | सहकार वर्षात परतफेड केलेली रक्कम | सहकार वर्षात येणे रक्कम | येणे रक्कमे पैकी थकबाकी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | संचालकांना दिलेली कर्जे | -- | -- | -- | -- | -- | |
| २) | संचालकांच्या नातेवाईकांना दिलेली कर्जे | -- | -- | -- | -- | -- | |
| | एकूण | -- | -- | -- | -- | -- | |

**संचालक व त्यांच्या नातेवाईकांकडुन दि.३१/०३/२०२१ अखेर कोणत्याही प्रकारची कर्जे येणे नाहीत वा सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षामध्ये त्यांना कोणत्याही प्रकारची कर्जे अदा केलेली नाहीत.**

**❊ नफा विभागणी :**

दि. ३१-३-२०२१ अखेर बँकेच रु. १९.४६ लाख इतका निव्वळ नफा झालेला आहे. त्याची मा. संचालक मंडळाने बँकेच्या पोटनियमाप्रमाणे विभागणी केलेली असुन ती आपल्या मंजुरीसाठी सादर करीत आहोत.

| अ.नं. | तपशिल | रक्कम | एकुण रक्कम |
|---|---|---|---|
| १ | मागील शिल्लक नफा | | १६,३७६.३२ |
| २ | चालु सालचा ढोबळ नफा | ३१,९१,०२६.४३ | |
| | एकुण ढोबळ नफा | | ३२,०७,४०२.७५ |
| | वजा | | |
| ३ | इन्कम टॅक्स तरतुद | १२,४५,000.00 | |
| | **निव्वळ नफा** | | **१९,६२,४०२.७५** |
| | **वाटपासाठी उपलब्ध नफा** | | **१९,६२,४०२.७५** |
| | **नफा विभागणी** | | |
| १ | राखीव निधी (२५%) | ४,९०,६00.६९ | |
| | वाढीव | ९४,५९९.३१ | |
| २ | इमारत निधी | २,२५,000.00 | |
| ३ | लाभांश समकरण निधी | ६0,000.00 | |
| ४ | गुंतवणुक घसारा निधी | ५,00,000.00 | |
| ५ | निवडणुक खर्च निधी | ५,00,000.00 | |
| ६ | प्रशिक्षण निधी | २५,000.00 | |
| ७ | टेक्निकल डेव्हलपमेंट फंड | ५४,000.00 | |
| | **विभागणीची एकुण रक्कम** | **१९,४९,२00.00** | |
| | **चालु सालअखेर शिल्लक नफा** | | **१३,२०२.७५** |

संचालक मंडळाने वरीलप्रमाणे सुचविलेली नफा विभागणी अवलोकनी घ्यावी व त्यास मंजुरी द्यावी.

**❊ संचालक मंडळ :**

अहवाल सालामध्ये संचालक मंडळाच्या **१४** सभा झालेल्या आहेत. या सभांमध्ये एकुण **२५६** ठराव एकमताने संम्मत झालेले आहेत. रिझर्व्ह बँकेने विहीत केलेल्या कॅलेंडर रिव्ह्युप्रमाणे सभेमध्ये कामकाज होत असुन, त्यानुसार विविध बाबींचा आढावा घेतला गेलेला आहे. बँकेच्या संचालक

मंडळाने एकदिलाने, एकमताने, खेळीमेळीच्या वातावरणांत, अत्यंत पारदर्शक व प्रामाणिकपणे बँकेच्या प्रगतीसाठी व विकासासाठी काम केलेले आहे.

याशिवाय बँकेचे दैनंदिन कामकाज, ठेव व कर्ज वाढ, फायदेशिर गुंतवणुक, एनपीए वसुली, नविन कर्ज व ठेव योजना इ. धोरणात्मक व बँकेच्या प्रगतीस पोषक व हिताचे निर्णय पुर्ण विचारांती व सांगोपांग चर्चा करुन एकमताने घेतलेले आहेत. सर्वच संचालक सदस्यांनी आपला बहुमोल वेळ बँकेस दिलेला आहे. त्यांच्या या सर्वंकष सहकार्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे.

तसेच बँकेकडे संचालक सदस्यांच्या पुढीलप्रमाणे उपसमित्या कार्यरत आहेत. या समित्यांच्या झालेल्या कामकाजातुन त्यांनी बँकेच्या हिताच्या व प्रगतिच्या दृष्टीने धोरणात्मक निर्णय घेणेस मार्गदर्शन केलेले आहे.

१. ऑडीट उपसमिती (४ सभा), २. गुंतवणुक उपसमिती (६ सभा), ३. थकबाकी उपसमिती (४ सभा), ४. एएलएम उपसमिती (४ सभा), ५. स्टाफ कमिटी (२ सभा), ६. कर्ज व्यवहार व देखरेख समिती (१२ सभा)

**※ शाखा व्यवहार :**

सध्या केंद्र कार्यालयासह बँकेच्या आठ शाखांमधुन कामकाज चालते. बँकेच्या सर्व शाखांचे कामकाज समाधानकारक आहे. कोअर बँकींग प्रणालीमध्ये सर्व शाखांचे कामकाज सुरु आहे. त्यामुळे बँकेच्या सभासद, ग्राहकांना त्यांचे सर्व व्यवहार कोणत्याही शाखेतुन करता येतात. सीटीएस २०१० चेक्स व सीटीएस क्लिअरींगमुळे ग्राहकांना त्यांचे आर्थिक व्यवहार वेगाने करता येत आहेत. तसेच बँकींगमधील अत्याधुनिक सेवा आपल्या बँकेच्या सर्व शाखांमधुन देण्यात येत आहेत.

## शाखांची आर्थिक स्थिती

| अ.नं. | शाखा | ठेवी | कर्ज | नफा/तोटा | एनपीए मुद्दल | एनपीए मुद्दलाचे येणेकर्जाशी शे.प्र. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | हेडऑफीस | - | - | - ३१.५९ | - | - |
| २ | कोडोली | २७३५.५३ | १५५८.०४ | १०.५९ | १०३.३२ | ६.६३ |
| ३ | कळे | ८४६.६५ | ५५०.१९ | ९.१० | ९३.३७ | १६.९७ |
| ४ | केर्ली | ४९८.६१ | २७०.६९ | ९.७३ | २२.८१ | ८.४३ |
| ५ | कोतोली | ३२५.७९ | २०९.६७ | ४.६१ | ६.६६ | ३.१८ |
| ६ | बांबवडे | ७०५.०० | ३५६.०७ | ३.७४ | ३.२८ | ०.९२ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ७ | सरुड | २६१.७८ | २०५.४७ | २.३३ | ३.५६ | १.७३ |
| ८ | वाठार | ३७६.४८ | २६२.०३ | ७.८१ | ९.८८ | ३.७७ |
| ९ | कोल्हापूर | ४५३.०० | ३२६.६५ | ३.१४ | ७७.११ | २३.६१ |
| | **एकुण** | **६२१०.८४** | **३७३८.८१** | **१९.४६** | **३१९.९९** | **८.५६** |

### ❊ सनदी लेखा परिक्षण :

सन २०२०-२१ चे सनदी लेखापरिक्षण मा. ए. के. उमराणी ॲन्ड कंपनी, चार्टर्ड अकौटंट, कोल्हापूर यांनी केले असुन, त्यांनी बँकेस सन २०२०-२१ या आर्थिक वर्षासाठी **ऑडीट वर्ग 'अ'** दिलेला आहे. त्यांनी त्यांचा लेखापरिक्षण अहवाल बँकेस सादर केला आहे. त्याद्वारे त्यांनी केलेल्या सुचना व मार्गदर्शनाबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे. सदर लेखापरिक्षकांचा अहवाल दोषदुरुस्तीसह आपले समोर सादर केलेला आहे. त्याची दखल घ्यावी व तो कायम करणेत यावा.

### ❊ समवर्ती लेखा परिक्षण :

सन २०२०-२१ सालासाठी समवर्ती लेखा परिक्षणासाठी मा. एस.एस.पोवार चार्टर्ड अकौंटंट, कोल्हापूर यांची बँकेने नेमणुक केलेली होती. त्यांनी त्यांच्या लेखापरिक्षणाचे अहवाल बँकेस सादर केलेले आहेत. त्याद्वारे त्यांनी केलेल्या सुचना व मार्गदर्शनाबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

### ❊ व्हीएपीटी ऑडीट, आयएस ऑडीट, इडीपी ऑडीट :

रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्वानुसार बँकेचे व्हीएपीटी ऑडीट, आयएस ऑडीट, इडीपी ऑडीट होणे आवश्यक आहे. त्यानुसार बँकेने सदरची ऑडीट करण्यासाठी मे. लुमिव्हर्स सोल्युशन्स प्रा. लि. नाशिक यांची नेमणुक केलेली आहे.

### ❊ माहिती व तंत्रज्ञान :

बँकींग क्षेत्रात तंत्रज्ञानाचा वापर मोठ्या प्रमाणात सुरु झाला आहे. इंटरनेट बँकींग, मोबाईल बँकींग या सारख्या सेवांमुळे ग्राहक घरबसल्या त्याचे बँकींग व्यवहार करु लागला आहे. आरटीजीएस. एनइएफटी, रुपे डेबिट कार्ड, सीटीएस क्लिअरींग इ. अशया विविध सुविधा ग्राहकांना मिळु लागल्या आहेत. त्यामुळे तो त्याचे वेगवेगळ्या प्रकारचे आर्थिक व्यवहार ज्यामध्ये रक्कमा दुसऱ्या खात्यावर वर्ग करणे, विविध बिलांचे पेमेंट, कर भरणा इ. कमी वेळेत, कमी खर्चात व सुरक्षितपणे करु शकत आहे. बँकेने क्युआर कोड ही युपीआयची सेवा उलपब्ध केलेली आहे.

माहिती व सायबर सुरक्षा हा तंत्रज्ञानाच्या दृष्टीने एक महत्वाचा व गंभीर विषय आहे. आपल्या बँकेने या अनुषंगाने ज्या कांही महत्वाच्या बाबी आहेत वा जे सुरक्षा निकष आहेत त्याची

धोरणे निश्चित केलेली आहेत. त्याची काटेकोर अंम्मल बजावणी केली जात आहे. त्यादृष्टीने बँकेच्या या संगणकीय प्रणालिचे व्हीएपीटी, सिस्टीम ऑडीट व इडीपी ऑडीट करुन घेतले जात आहे.

**⁕ कोअर बँकींग :**

आपली बँक नॅशनल पेमेंट कार्पोरेशन ऑफ इंडिया (NPCI) ची सभासद झालेली असुन फंड ट्रान्स्फर, सीटीएस क्लिअरींग इ. सेवा सभासद व ग्राहकांना देत आहे.

**⁕ सेवक वर्ग :**

सेवक वर्ग हा बँकेचा कणा असुन, आपल्या बँकेचा सेवक वर्ग त्या दृष्टीने महत्वाची भुमिका पार पाडत आहे.

सेवक वर्गाने कोरोना सारख्या महासंकटामध्ये सभासद, ग्राहकांना त्यांच्या आर्थिक गरजा भागविण्यासाठी व बँकींग सेवा देण्यासाठी, बँकेच्या सर्व शाखांचे कामकाज कोणतीही पर्वा न करता चालु ठेवलेले होते. त्यांच्या या सेवेबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे.

अत्यंत विनयशिल, तत्पर व उत्तम सेवा दिल्यामुळे शाखांच्या कार्यक्षेत्रात स्पर्धा असतानाही ग्राहक वर्ग कायम ठेवण्यात शाखांनी यश मिळवलेले आहे. त्याचीच परिणीती शाखांच्या आर्थिक प्रगतीतुन दिसुन येते. संचालक मंडळाने घेतलेल्या कार्यालयीन निर्णयाची काटेकोर अंम्मलबजावणी सेवक वर्ग करीत आहे. तसेच बँकेने निश्चित केलेली ध्येयधोरणे उत्तम रितीने राबवली जात आहेत. बँकेच्या कामकाजामध्ये सातत्य राखण्यात कर्मचारी वर्गाचे मोठे योगदान आहे. त्याबद्दल मी त्याचा आभारी आहे.

**⁕ श्रध्दांजली :**

बँकेचे माजी संचालक अशोक शंकरराव पाटील (तात्या) यांचे आकस्मिक निधन झाले. आपल्या बँकेचे वसुली अधिकारी सुनिल रामचंद्र निकम यांचे अल्पशा आजाराने निधन झाले.

तसेच अहवाल सालात बँकेचे सभासद, हितचिंतक, ठेवीदार, ग्राहक देशातील राजकीय सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील थोर व्यक्ती, भागातील ज्ञात अज्ञात व्यक्तींचे निधन झाले.

**त्या सर्वांना बँकेतर्फे भावपूर्ण श्रध्दांजली ! त्यांच्या मृत्तात्म्यास ईश्वर चिरशांती देवो, ही ईश्वर चरणी प्रार्थना !**

**⁕ आभार :**

बँकेचे सभासद, ठेवीदार, हितचिंतक या सर्वांच्या बँकेवरील विश्वासामुळे, व सहकार्याच्या पाठबळावर स्पर्धेच्या युगातही नवनविन आव्हानांना तोंड देत बँकेने प्रगती साधलेली आहे.

तो विश्वास व सहकार्य यापुढे कायम राहो ही अपेक्षा. आपल्या या विश्वासार्ह सहकार्याबद्दल आपले आभार !

सेवक वर्गाने त्यांच्यावर सोपवलेल्या जबाबदाऱ्या व्यवस्थित पार पाडलेल्या असुन बँकेच्या प्रगतीस मोलाचा हातभार लावलेला आहे. कर्मचारी वर्गाच्या या सहकार्याबद्दल त्यांचा आभारी आहे.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, मा. विभागीय सहनिबंधकसो, सह संस्था, कोल्हापूर विभाग कोल्हापूर, मा. जिल्हा उपनिबंधकसो, सह संस्था, कोल्हापूर मा. विशेष लेखा परिक्षक, जिल्हा कोल्हापूर, बँक फेडरेशन्स, बँक असोसिएशन्स, बँकर्स, इतर संबंधित संस्था व त्यांचे पदाधिकारी यांनी बँकेस वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शनाबद्दल व सहकार्याबद्दल त्यांचे मनःपुर्वक आभार मानतो.

आपण सर्व सभासद बंधु-भगिनींचे पुनःश्च एकदा हार्दिक स्वागत करतो. पोटनियम दुरुस्ती आपणापुढे सादर केलेली बँकेची आर्थिक पत्रके, नफा विभागणी, वार्षिक अहवाल व अंदाजपत्रक अवलोकनी घ्यावीत व त्यास मंजुरी द्यावी, ही विनंती.

धन्यवाद !

दि. १५-९-२०२१

**मा. श्री. राहुल प्रकाश पाटील**

अध्यक्ष

दि कोडोली अर्बन को-ऑप. बँक लि; कोडोली.

**।। जय हिंद । जय महाराष्ट्र ।।**

## ताळेबंद पत्रक

| दि. ३१-३-२०२० रुपये पैसे | भांडवल व देणी | दि. ३१-३-२०२१ रुपये पैसे |
|---|---|---|
| ३,००,००,०००-०० | अधिकृत भाग भांडवल | ३,००,००,०००-०० |
| | (प्रत्येकी रुपये १००/-चे ३००००० भाग ) | |
| २,२९,८१,२००-०० | वसुल भाग भांडवल | २,४०,२३,६२५-०० |
| ६,१६,९३,१८२-७९ | राखीव व इतर निधी (परिशिष्ट १) | ६,४६,१३,६३९-४६ |
| ५८,५४,४४,५३०.८५ | ठेवी (परिशिष्ट २) | ६२,१०,८४,३०२-७४ |
| ०-०० | वसुलीची बिले (नांवे बाजुप्रमाणे) | ०-०० |
| २,८२,७४,१६२-७५ | थकव्याज तरतुद (परिशिष्ट ३) | ३,५४,९५,३११-७५ |
| २,२४,२४,६७६-५० | देणे व्याज | २,०२,५३,७३१-०० |
| १,३०,८०,०७२-८६ | इतर देणी (परिशिष्ट ४) | १,१९,८३,६५०.२६ |
| ९,३६१-०८ | मागील शिल्लक नफा | १६,३७६.३२ |
| ४२,३९,२६६-९१ | चालु निव्वळ नफा (परिशिष्ट ५) | १९,४६,०२६.४३ |
| ७३,८१,४६,४५३-७४ | एकूण | ७७,१४,१६,६६२.७४ |

येणेप्रमाणे असे दि. ३१/३/२०२१

| श्री. संतोष बी. माने | मा. श्री. सचिन पां. जाधव | मा. श्री. राहुल प्रकाश पाटील |
|---|---|---|
| मुख्य कार्यकारी अधिकारी | उपाध्यक्ष | अध्यक्ष |

# दि कोडोली अर्बन को-ऑप बँक लि., कोडोली

प्रधान कार्यालय- कोडोली, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर-४१६११४.

## दि. ३१.३.२०२१ रोजीचे

| दि. ३१-३-२०२० रुपये पैसे | मालमत्ता व येणी | दि. ३१-३-२०२१ रुपये पैसे |
|---|---|---|
| १२,३४,७२,३५०-६० | रोख व बँकातील शिल्लक (परिशिष्ट ६) | १४,२९,८३,३००-२५ |
| १४,५९,८१,१४३-०० | गुंतवणुक एस.एल.आर. (गव्ह. सिक्यु.) (परिशिष्ट ७) | १४,५९,६६.३३५-०० |
| ४,९१,२२,०००-०० | गुंतवणुक-बँकांतील ठेवी व नॉन एस.एल.आर. (परिशिष्ट ८) | ५,२६,२२,०००-०० |
| ३६,०८,१४,३१६-६१ | कर्जे (परिशिष्ट ९) | ३७,३८,८१,२२७-६७ |
| ३,१०,७५,१२६-७५ | येणे व्याज | ३,८४,४७,९३६-७५ |
| ०-०० | वसुलीची बिले (जमा बाजुप्रमाणे) | ०-०० |
| १,४६,३६,३२८-०० | इमारत (कळे/कोडोली) | १,३१,७२,६९५-०० |
| ४६,४९,१२५-३६ | डेड.फर्निचर, स्टेशनरी, कॉम्प्युटर (परिशिष्ट १०) | ४५,२९,४४८-३७ |
| ८३,९६,०६३-४२ | इतर येणी (परिशिष्ट ११) | ७८,१३,७१९-९१ |
| ७३,८१,४६,४५३-७४ | एकूण | ७७,९४,१६,६६२-९५ |

**मे. ए. के. उमराणी अॅन्ड कंपनी**

चार्टर्ड अकौंटंट

कोल्हापूर

## नफा-तोटा पत्रक

| दि. ३१-३-२०२० रुपये पैसे | खर्च | दि. ३१-३-२०२१ रुपये पैसे |
|---|---|---|
| ४,३२,२९,६६२-०० | ठेवीवरील व्याज | ४,०४,८१,००६-५० |
| ०-०० | कर्जावरील दिलेले व्याज | ०-०० |
| १,२१,००,४५६-५० | पगार व भत्ते (परिशिष्ट १२) | ९८,३१,९८६-८८ |
| १९,५९,३७०-१२ | ऑफीस खर्च भाडे, विमा, दिवाबत्ती इ. (परिशिष्ट १३) | २४,५७,८७८-१८ |
| ११,३३,०८९-७१ | प्रिंटींग, स्टेशनरी, जाहिरात (परिशिष्ट १४) | १०,४८,१३५-५० |
| ५२,०००-०० | लॉ चार्जेस | ३६,०००-०० |
| ५,४७,१०६-०० | पोष्टेज तार व टेलीफोन | ५,२७,११९-२० |
| ६,८६,४७३-०० | ऑडीट फी | ७,५३,५००-०० |
| ३३,०४,३५१-५० | झीज व करंट रिपेअरी (परिशिष्ट १५) | ३८,१४,५५७-२२ |
| ३,१६,००१.५० | मिटींग खर्च व भत्ते (परिशिष्ट १६) | २,५१,६५२-०० |
| २८,२१,४१४-८० | इतर खर्च (परिशिष्ट १७) | २३,४३,२५६-१६ |
| ५७,८७,३६५-०० | तरतुदी | ०-०० |
| २५,४३,६३८-०० | इन्कम टॅक्स | १२,४५,०००-०० |
| ४२,३९,२६६-९१ | निव्वळ नफा | १९,४६,०२६-४३ |
| ७,८७,२०,१९५-८४ | एकूण | ६,४७,३६,११८.०७ |

येणेप्रमाणे असे दि. ३१-३-२०२१

| श्री. संतोष बी. माने | मा. श्री. सचिन पां. जाधव | मा. श्री. राहुल प्रकाश पाटील |
|---|---|---|
| मुख्य कार्यकारी अधिकारी | उपाध्यक्ष | अध्यक्ष |

# दि. १.४.२०२० ते दि. ३१.३.२०२१ अखेरचे

| दि. ३१-३-२०२० रुपये पैसे | उत्पन्न | दि. ३१-३-२०२१ रुपये पैसे |
|---|---|---|
| ५,४१,१०,६०६-१६ | कर्जावरील मिळालेले व्याज | ४,६३,१६,८९७-५० |
| १,६२,४२,५२५-२५ | गुंतवणुकीवरील व्याज व डिव्हिडंड (परिशिष्ट १८) | १,६३,३९,७४७-२८ |
| १,२३,२२१-२५ | कमिशन | १,४५,१९९-९५ |
| १७,०३,८१४-१८ | इतर उत्पन्न (परिशिष्ट १९) | १९,३४,२७३-३४ |
| १९,९६,५००-०० | सरकारी रोखे विक्रीतील नफा | ००-०० |
| ००-०० | नॉन बँकिंगअसेट विक्रीतील नफा | ००-०० |
| ४५,००,०००-०० | बुडीत कर्ज निधी (रिव्हर्स) | ००-०० |
| ४३,५२९-०० | डिफर्ड टॅक्स लायबिलीटी (रिव्हर्स) | ००-०० |
| ७,८७,२०,१९५-८४ | एकूण | ६,४७,३६,११८-०७ |

**मे. ए. के. उमराणी ॲन्ड कंपनी**
चार्टर्ड अकौंटंट
कोल्हापूर

## DISCLOUSER OF INFORMATION AS PER RBI CIRCULAR -
## [UBD. CO. BPD (PCB) No. 52/12.02.001/2013-14 Dt. 25/03/2014]

| Sr. No. | Particular | 31-03-2020 | 31-03-2021 |
|---|---|---|---|
| 1 | **Capital To Risk Assets Ratio %** | 18.92 | 16.97 |
| 2 | **Movement of CRAR** | 3.97 | -1.95 |
| | a) Tier I Capital | 454.83 | 457.46 |
| | b) Tier II Capital | 127.84 | 129.80 |
| | c) Risk Weighted Assets | 3079.38 | 3461.62 |
| 3 | **Investments** | | |
| | a. Book Value | 1459.81 | 1459.66 |
| | b. Face Value | 1475.00 | 1475.00 |
| | c. Market Value | 1534.73 | 1548.86 |
| | d. Details of Issuer composition of Non-SLR Investment and Non-Performing Non-SLR Invest. | 50.00 | 50.00 |
| 4 | **Advance Against** | | |
| | Real Estate, | 0.00 | 0.00 |
| | Construction business | 0.00 | 0.00 |
| | Housing | 453.24 | 412.39 |
| 5 | **Advance Against Shares & Debentures** | Nill | Nill |
| 6 | **Advance to directors, their relatives, Compaines / Firms in which they are Interested** | | |
| | a. Funded | Nill | Nill |
| | b. Non Funded | Nill | Nill |
| 7 | **Cost of Deposits : Average Cost of Deposists** | | |
| | Average Deposits | 5752.16 | 6011.08 |
| | Interest Paid | 432.30 | 404.81 |
| | Cost of Deposits % | 7.52 | 6.73 |
| 8 | **Non Performing Assest (NPA)** | | |
| | a. Gross NPAs | 368.17 | 319.99 |
| | % of Gross NPAs | 10.20 | 8.56 |
| | b. Net NPAs | 152.88 | 87.83 |
| | % of Net NPAs | 4.51 | 2.50 |
| 9 | **Movement in NPAs** | | |
| | Gross NPAs Opening Balance | 395.50 | 368.17 |
| | Add : During the year | 23.68 | 28.32 |
| | Less : During the year (closed / recovered) | 51.01 | 76.50 |
| | Gross NPAs Closing Balance | 368.17 | -319.99 |

| Sr. No. | Particular | | 31-03-2020 | 31-03-2021 |
|---|---|---|---|---|
| 10 | **Profitability** | | | |
| | a. Interest Income as percentage of Working Funds | % | 10.07 | 8.04 |
| | b. Non Interest Income as percentage of Working Funds | % | 1.13 | 0.27 |
| | c. Operating Profit as percentage of working funds | % | 1.70 | 0.41 |
| | d. Return on Assets | % | 0.63 | 0.25 |
| | e. Business (Deposit +Advance ) per employee | Rs. | 249.01 | 191.34 |
| | f. Profit per employee | % | 1.06 | 0.37 |
| | g. Working Funds (Average) | Rs. | 7381.52 | 7794.17 |
| | h. Total Employee | | 43 | 52 |
| 11 | **Provisions made towards** | | | |
| | a. Provision required to be made for NPAs | | 97.36 | 117.29 |
| | b. Provision actually made for NPAs | | 210.87 | 224.00 |
| | c. Depreciation In Investments Required to be made | | 10.00 | 20.00 |
| | d. Depreciation In Investments actually made | | 10.00 | 14.03 |
| | e. Provision Required to be made for Standered Assets | | 8.10 | 8.55 |
| | f. Provision actually made for Standerd Asset | | 10.25 | 10.25 |
| 12 | **Movement in provision** | | | |
| | a. Towords NPAs | | 5.87 | 14.03 |
| | b. Towords Depreciation in Invesments | | 10.00 | 0.00 |
| 13 | **DICGC Latest advance premium paid** | | 7.02 | 8.87 |
| 14 | **Foreign curency assets & libilities** | | No | No |
| 15 | **Penalty imposed by RBI** | | No | No |
| 16 | **Restructured Accounts** | | No | No |
| 17 | **Fixed Assets - Valuation / Revaluation** | | | |
| | a. Policy | | Yes | Yes |
| | b. Revaluation Date | | 17-Dec-15 | 25-9-2020 |
| | c. Revaluation Amount | | 148.73 | 120.47 |
| 18 | **Deposit Education & Awareness Fund 2014** | | **2019-2020** | **2020-2021** |
| | Opening balance of transferred to DEAF | | 16.84 | 17.21 |
| | Add : Amounts transfered to DEAF during the year | | 0.37 | 3.60 |
| | Less : Amounts reimbursed by DEAF towards claims | | 0.00 | 0.00 |
| | Closing balance of amounts transferred to DEAF | | 17.21 | 20.81 |

Name of the Bank - **The Kodoli Urban Co-op. Bank Ltd. Kodoli**
Head Office - A/p. Kodoli, Tal. Panhala, Dist. Kolhapur
Date of Registration - 27-10-1962
RBI Licence No & Date - ACD. MH.156 P. DT. 12-10-1979
Area of Operation - Kolhapur Dist. & Tal-Shirala & Walava of Sangali Dist.

| Sr. No. | Particular | | 31-03-2021 |
|---|---|---|---|
| 1 | No. of branches including H.O. | | 9 |
| 2 | Membership | Regular | 33857 |
| | | Nominal | 149 |
| 3 | Paid -up Capital | (Rs. in lakhs) | 240.24 |
| 4 | Total Reserves & Funds | | 646.14 |
| 5 | Deposits | | **6210.84** |
| | | Savings | 787.60 |
| | | Current | 188.38 |
| | | Fixed | 5234.86 |
| 6 | Advances | | **3738.81** |
| | | Secured | 3719.29 |
| | | Unsecured | 19.52 |
| | Total % of Priority Sector | | 59.26% |
| | Total % of Weaker Section | | 16.02% |
| 7 | Borrowings | | 00.00 |
| 8 | Investment | | **1985.88** |
| | | K.D.C.C Bank | 225.00 |
| | | M.S.C.Bank | 1.00 |
| | | Govt. Securities | 1459.66 |
| | | Others | 300.22 |
| 9 | Overdues % | | **6.27%** |
| 10 | Net NPA% | | **2.50%** |
| 11 | CRAR | | **16.97%** |
| 12 | MIS OF URBAN BANKS | CD Ratio | 60.20% |
| | | OVERDUES (Rs.in lakhs) | 234.39 |
| | | % OVERDUES | 6.27% |
| 13 | Profit for the year | (Rs.in lakhs) | **19.46** |
| 14 | Audit Classification Dt. 31-3-20 | | **'A'** |
| 15 | Total Staff - 52 Sub-Staff - 14 Other Staff - 38 | | **52** |
| 16 | Working Capital | (Rs.in lakhs) | **7794.16** |

## खर्चाचे अंदाजपत्रक सन २०२१-२२

| तपशील | सन २०२०-२१ सालासाठी मंजुर बजेट | प्रत्यक्ष झालेला खर्च | मंजुर बजेट पेक्षा जादा झालेला खर्च | सन २०२१-२२ सालासाठी मागणी | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| **व्यवस्थापकीय खर्च** | | | | | |
| नोकर पगार भत्ता व इतर खर्च | १,००,००,००० | ९८,३१,९८७ | -- | १,२०,००,००० | |
| पिग्मी एजंट कमीशन | २०,००,००० | १६,८६,३५३ | -- | २०,००,००० | |
| ऑफीस भाडे, विमा, दिवाबत्ती व टॅक्स | २५,००,००० | २४,५७,८७८ | -- | २३,००,००० | |
| पोष्टेज तार व टेलीफोन | ५,५०,००० | ५,२७,११९ | -- | ६,००,००० | |
| प्रिंटींग स्टेशनरी व जाहिरात | ११,००,००० | १०,४८,१३५ | -- | १२,००,००० | |
| प्रवास खर्च | १,५०,००० | १,४६,११३ | -- | १,७५,००० | |
| संचालक सभा भत्ता व खर्च | १,५०,००० | १,२६,२७७ | -- | २,००,००० | |
| वा.स.सभा व इतर समारंभ खर्च | १,५०,००० | १,२९,९३० | -- | १,७५,००० | |
| लॉ चार्जेस | ५०,००० | ३६,००० | -- | १,००,००० | |
| असो. व अधिवेशन वर्गणी व ट्रेनिंग | १,००,००० | ७४,८२० | -- | ५०,००० | |
| झीज व करंट रिपेअरी | ४०,००,००० | ३८,१४,५५७ | -- | ३५,००,००० | |
| ऑडीट फी | ८,००,००० | ७,५३,५०० | -- | ७,००,००० | |
| संचालक, कर्मचारी व सभासद प्रशिक्षण | २५,००० | ४,८३० | -- | ५०,००० | |
| वसुली खर्च | २,००,००० | १,५९,९६१ | -- | ५०,००० | |
| बँक व्यवसाय कर व चार्जेस | ७५,००० | ५७,१५६ | -- | २,००,००० | |
| किरकोळ, चहापान खर्च/इतर खर्च | २,५०,००० | २,११,४९० | -- | २,००,००० | |
| **एकूण व्यवस्थापकीय खर्च** | २,२१,००,००० | २,१०,६६,११४ | -- | २,३५,००,००० | |
| **भांडवली खर्च** | | | | | |
| शाखा कोल्हापूर फर्निचर /फिक्चर्स/डेडस्टॉक | ५,००,००० | ४,९१,५२९ | -- | -- | नविन जागेत स्थलांतर करणेसाठी |
| शाखा केर्ली फर्निचर/फिक्चर्स/डेडस्टॉक | -- | -- | -- | ५,००,००० | |
| डाटा सेंटर (डीआर व डीसी) नुतनीकरण | ३५,००,००० | -- | -- | ३५,००,००० | रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्वानुसार |
| **एकूण भांडवली खर्च** | ४०,००,००० | ४,९१,५२९ | -- | ४०,००,००० | |
| **एकूण** | २,६१,००,००० | २,१५,५७,६४३ | -- | २,७५,००,००० | |

येणे प्रमाणे असे दि. १५-९-२०२१

**श्री. संतोष बी. माने** — मुख्य कार्यकारी अधिकारी

**मा. श्री. सचिन पां. जाधव** — उपाध्यक्ष

**मा. श्री. राहुल प्रकाश पाटील** — अध्यक्ष

## संभाव्य उत्पन्न, खर्च व नफ्याचे अंदाज पत्रक सन २०२१-२२

| उत्पन्न तपशील | सन २०२०-२१ प्रत्यक्ष उत्पन्न | सन २०२१-२२ संभाव्य उत्पन्न | खर्च तपशील | सन २०२०-२१ प्रत्यक्ष खर्च | सन २०२१-२२ संभाव्य खर्च |
|---|---|---|---|---|---|
| कर्जावरील व्याज | ४६३.१७ | ६५०.०० | ठेवीवरील व्याज | ४०४.८१ | ४५०.०० |
| गुंतवणुकीवरील व्याज व डिव्हीडंड | १६३.४० | १५५.०० | व्यवस्थापन खर्च | २१०.६५ | २३५.०० |
| कमीशन | १.४५ | २.५० | तरतुदी | ०.०० | ३०.०० |
| इतर उत्पन्न | १९.३५ | १७.५० | इन्कम टॅक्स | १२.४५ | ३५.०० |
| | | | नफा/संभाव्य नफा | १९.४६ | ७५.०० |
| एकूण | ६४७.३७ | ८२५.०० | एकूण | ६४७.३७ | ८२५.०० |

येणे प्रमाणे असे

दि. १५-९-२०२१